# जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ

## उत्कृष्ठ लघु उद्योग घटकांना पुरस्कार (जिल्हास्तरीय)

या योजने अंतर्गत स्पर्धेत पात्र होण्यासाठी

१. घटक थकबाकीदार नसावा

२. मागील पाच वर्षात (कॅलेंडर) स्थाई नोंदणी होवुन उत्पादनात गेलेला असावा.

३. सातत्याने दोन वर्ष उत्पादनातील असावा.

४. नफा तोटा, कामगार कल्याण, मालाचा दर्जा ,उत्तम विक्री ,इत्यादी निकषावर जिल्हास्तरीय दोन उत्कृष्ठ घटकांना पुरस्कार दिले जातात

अ) प्रथम पुरस्कार रु. १५०००/- शाल श्रीफळ व गौरव चिन्ह देवुन
सन्माननिय व्यक्तीकडुन सत्कार केल्या जातो

ब) द्वितीय पुरस्कार रु. १००००/- शाल श्रीफळ व गौरव चिन्ह देवनु
सन्माननिय व्यक्तीकडुन सत्कार केल्या जातो

५. या पुरस्कारामुळे व्यापक प्रसिध्दी होवुन मोठया प्रमाणावर उत्पादनास बाजापेठ मिळण्यास पुरक ठरु शकते त्यामुळे दरवर्षी विहित नमुन्यात योग्य त्या कागदपत्रासह जास्तीत जास्त घटकांनी स्पर्धेत सहभागी होणे आवश्यक आहे.

-@@@-

# <u>जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ</u>

## उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम

### सर्वसाधारण सवर्गासाठी

१. या योजनेअंतर्गत उद्योग व्यवसाय संबंधीची व्यवस्थापकीय दृष्टीकोणातुन उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रमातुन पायाभुत व सविस्तर माहिती तथा मार्गदर्शन केले जाते
२. प्रशिक्षण कालावधी १५ दिवसाचा असतो
३. अर्जदार किमान एसएससी पास व १८ ते ३५ या वयोमर्यादेत असावा
४. प्रशिक्षणाची फी ही रु. ३५०/- असुन रु. १००/ जिल्हा उद्योग केंद्रातुन देण्यात येते उर्वरीत रक्कम अर्जदारास भरावी लागते
५. प्रशिक्षण अधिकृत संस्थेमार्फत देण्यात येते.
६. प्रशिक्षणा नंतर सदर संस्थेकडुन उद्योग स्थापन होईपर्यत योग्य तो पाठपुरावा संपर्कात राहिल्यास पाठपुरावा व मार्गदर्शन केले जाते.
७. अनुसुचित जातीच्या उमेदवारांना या योजनेअंतर्गत विशिष्ट व्यवसायाचे एक महिन्याचे तांत्रिक प्रशिक्षण दिले जाते.
८. सहभागी अनुसुचित जातीचे प्रशिक्षणार्थ्यांनां  प्रत्येकी रु. १०००/- विद्यावेतन व उद्योग स्थापन करण्याच्या दृष्टीने पुढील पाठपुरावा करण्यात येतो.

-@@@-